लोकमत

# अंतिम वर्षाच्या परीक्षा संपल्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष, सत्राच्या परीक्षा मंगळवारी संपल्या. पदवी, पदविका अभ्यासक्रमांच्या शंभर परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. उर्वरित निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून येत्या दोन दिवसांमध्ये जाहीर केले जाणार आहेत. विद्यापीठाने अंतिम वर्ष, सत्राच्या परीक्षा दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू केल्या. १७२ परीक्षा मंगळवारी संपल्या. उर्वरित परीक्षांचे निकाल येत्या दोन दिवसांमध्ये जाहीर केले जातील. त्यानंतर तांत्रिक अडचणींमुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही. त्यांची नोंद करून घेतली जाईल. या विद्यार्थ्यांची दिवाळीनंतर परीक्षा घेण्यात येईल. त्याचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर केले जाईल, असे परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 4 Nov 11, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# शुद्ध हवेबाबत आज ऑनलाईन कार्यशाळा

कोल्हापूर : शहरातील हवा प्रदूषणाबाबत जनजागृतीकरिता महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत ऑनलाईन कार्यशाळा आज, बुधवारी सकाळी अकरा ते दुपारी दोन यावेळेत होणार आहे. यावेळी पर्यावरण तज्ज्ञांची व्याख्याने होतील.

Hello Kolhapur Gramin
Page No. 4 Nov 11, 2020
Powered by: erelego.com

# क्षात्रजगद्गुरूंची नेमणूक; शाहू छत्रपतींचे धार्मिक क्रांतीचे पाऊल

**राजर्षी शाहू महाराजांनी १०० वर्षांपूर्वी अनेक महत्त्वपूर्ण, क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यापैकी एक म्हणजे क्षात्रजगद्गुरूंची नियुक्ती हा होय. संपूर्ण भारतात हिंदू धर्मात किंवा हिंदू संस्कृतीत जगद्गुरू निर्माण करण्याचे श्रेय हे छत्रपती शाहू महाराजांकडेच जाते. कारण, प्राचीन काळापासून हजारो वर्षे जगद्गुरू या पदावर विशिष्ट वर्गाचीच मक्तेदारी होती. आणि ही मक्तेदारी मोडून काढण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. ११ नोव्हेंबर १९२० रोजी मराठा उपाध्यांनी वैदिक मंत्रांच्या घोषात सदाशिवराव लक्ष्मणराव पाटील-बेनाडीकर यांचा सशास्त्र पट्टाभिषेक केला. क्षात्रपीठाची पुनर्स्थापना झाली. पाटगाव पीठाच्या परंपरेतील ते दहावे धर्मगुरू झाले. या घटनेला आज शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त या घटनेला हा उजाळा....**



राजर्षी शाहू महाराजांनी ११ नोव्हेंबर १९२० रोजी क्रांतिकारक निर्णय घेताना क्षात्रपीठाची पुनर्स्थापना केली. मराठा उपाध्यांनी वैदिक मंत्रांच्या घोषात सदाशिवराव लक्ष्मणराव पाटील-बेनाडीकर यांचा सशास्त्र पट्टाभिषेक केला. पाटगाव पीठाच्या परंपरेतील ते दहावे धर्मगुरू झाले.

प्राचीन काळात क्षत्रिय राजा ब्रह्मर्षी विश्वामित्र यांचा उल्लेख जगद्गुरू म्हणून झाल्याचे आपल्याला आढळून येते; पण ही गोष्ट अपवादात्मक आहे. अशाच प्रकारचे क्षत्रियांच्या जगद्गुरूचे एखादे पद निर्माण करावे आणि ते बहुजन क्षत्रियांना, ब्राह्मणेतरांना मार्गदर्शन करेल अशा पदाची निर्मिती शाहू महाराजांनी केलेली होती.

जोपर्यंत हिंदू जनतेला आपली धार्मिक कार्ये ब्राह्मण, पुरोहित, भटजी यांच्याशिवाय पार पाडता येत नाहीत असे वाटते, तोपर्यंत हिंदू समाजावर असलेला ब्राह्मणी वर्चस्ववाद, प्रभाव कमी होणार नाही, असा विचार करून शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केले; पण त्यात म्हणावे तसे यश न आल्याने पुढे आऊन त्यांनी एक नवा पण धाडसी विचार प्रत्यक्षात उतरविला. तो म्हणजे ब्राह्मणेतरांचे एक नवे धर्मपीठ निर्माण करण्याचे. त्यासाठी त्यांनी शिवकालीन प्रसिद्ध मराठा संत मौनीबाबा यांच्या पाटगाव येथील गादीची निवड केली.

महाराष्ट्रात जी अनेक धार्मिक क्षेत्रे आहेत, त्या अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण, पण आज विस्मृतीत गेलेले एक मध्ययुगीन धार्मिक पीठ म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील पाटगाव येथील मौनीपीठ हे होय. मौनीबाबांची व त्यांच्या पीठाची परंपरा मराठे ब्राह्मणेतरांची होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाला जाण्यापूर्वी मौनीबाबांची भेट घेतली होती. मोहीम पूर्ण करून परत आल्यावरही महाराज पाटगावला गेले होते. त्यानंतर शिवछत्रपतींनी अतित अभ्यागताबद्दल प्रतिवर्ष १००० लोकांच्या जेवणाची सामग्री नेमून दिली. ३ जून १६७८ च्या या शिवाजी महाराजांच्या सनदेनंतर राजर्षी शाहू छत्रपतींपर्यंत सर्वच छत्रपतींनी आणि त्यांच्या सरदारांनीही मौनीबाबा व मौनीपीठ यांसाठी जितक्या देणग्या दिल्या आहेत, तितक्या इतर कोणत्याही संताला, पीठाला दिलेल्या नाहीत. त्यामुळे राजर्षी शाहू छत्रपतींना वेदोक्त प्रकरणाच्या संदर्भात या पीठाचा पूर्वइतिहास अनुकूल वाटला. शाहू छत्रपतींना वेदोक्त मंत्राचा अधिकार नाही, असे त्यांच्या पदरी असलेल्या पुरोहितांनी सांगताच त्यांची दृष्टी अधिकच पुरोगामी बनली. अभिजन वर्गाच्या ब्राह्मण्यवृत्तीशी त्यांनी वैचारिक तसेच कृतिशील लढा दिला. अन्यायमूलक रुढी-परंपरांना धक्के देणारे अनेक कायदे व इतर उपाययोजना घडवून आणल्या. क्षात्रजगद्गुरू पदाची निर्मिती ही त्यापैकीच एक होय. हा एक आगळावेगळा, पुरोगामी, पण व्यवहार्य असा प्रयोग त्यांनी कार्यवाहीत आणला. बहुजन समाजासाठी क्षात्रजगद्गुरूंची स्थापना करून संपूर्ण समाजाला एक नवे धर्म नेतृत्व उपलब्ध करून दिले.

क्षात्रजगद्गुरू पदाच्या निर्मितीची विचार प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शाहू छत्रपतींनी १२ ऑक्टोबर १९२० रोजी क्षात्रजगद्गुरू पदाचा जाहीरनामा प्रसिद्ध करून आपण हे पद का निर्माण करत आहोत, त्यामागची आपली भूमिका काय आहे, हे स्पष्ट केले. या जाहीरनाम्यात ते म्हणतात,

डॉ. देविकाराणी पाटील

"हल्ली हिंदू समाजात ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे दोन पक्ष होऊन त्या दोहोंमध्ये निष्कारण वाद उत्पन्न होऊन विकोपास गेल्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. ही स्थिती देशहितास कोणत्याही प्रकारे इष्ट नाही. ब्राह्मणेतरास ब्राह्मणवर्ग धार्मिक व सामाजिक बाबतीत कमी लेखितो हे अगदी उघड आहे. हिंदू जनतेचा धर्म वैदिक असून तो सर्व संग्राहक असतानाही प्रचलित ब्राह्मणी धर्माने त्याचे स्वरूप अकुंचित व पुराणवादी पौरुषेय कल्पनामिश्रित केले आहे. यायोगे खऱ्या वैदिक धर्माच्या उज्ज्वल स्वरूपाची जाणीव जनतेस लुप्तप्राय होऊ लागली आहे. ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. अशा स्थितीमुळे लोकांचे वैदिक पद्धतीने संस्कृती होण्यास व त्यायोगे वैदिक धर्माचे खरे स्वरूप जाणण्यास काही साधन राहिले नाही. ब्राह्मण वर्ग व त्यांच्यातीलच जगद्गुरू म्हणविणारे यांचे लक्ष्य सनातन वैदिक धर्माकडे असावे असे नाही व त्यांच्या हातून इतरांची धर्मोन्नती होणे शक्यता नाही, असे ब्राह्मणेतरांचे म्हणणे असून तशा तऱ्हेची विनंतीपत्रेही इकडे आली आहेत. त्या अन्वये करवीर राज्यात क्षत्रिय मराठा जगद्गुरूचे पीठ होऊन त्यावर क्षत्रिय मराठा वर्गापैकी योग्य पुरुषाची स्थापना व्हावी आणि मराठा क्षत्रिय यांचे वैदिक धर्म संरक्षण करावे म्हणून क्षत्रिय मराठा वर्गातील अनेक प्रमुख सद्गृहस्थांकडून व ब्राह्मणेतर बहुजन समाजाकडून ही अनेक अर्ज इकडे सादर झाले आहेत. या सर्व अर्जांचा व साधकबाधक गोष्टींचा योग्य विचार करून इकडून असे ठरविण्यात येत आहे की, मराठा व ब्राह्मणेतर मंडळींचा विचार फक्त सुज्ञ असून इकडे पसंत आहे. एकाच राष्ट्रात राहून धार्मिक बाबतीत ब्राह्मणांशी वारंवार वाद करीत बसणे हे राष्ट्रासही विघातक आहे. आळस सोडून स्वतः प्रयत्न करणे मानवी कर्तव्य आहे."

या जाहीरनाम्यानंतर एकाच महिन्यात पाटगाव येथील मौनी पीठावर सदाशिवराव लक्ष्मणराव पाटील-बेनाडीकर या मराठा जातीतील होतकरू तरुणाला क्षात्रजगद्गुरू म्हणून बसविले. क्षात्रजगद्गुरू हे तत्त्वज्ञान व संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी वृत्तपत्रांमधून केलेले वैचारिक लिखाण शाहू छत्रपतींच्या वाचनात आले होते. बहुजन समाजाची अस्मिता व बहुजनांवरील अन्याय हे विषय त्यांच्या लिखाणाचे होते. त्यांच्या लेखणीने प्रभावित झालेल्या शाहू छत्रपतींनी त्यांना कोल्हापूरला बोलावून घेतले आणि आपल्या सान्निध्यात सोनतळी येथे ठेवून घेतले. त्यांचे वर्तन, धर्मसुधारणेचे सामाजिक बदलाचे विचार मनःपूर्वक ऐकून त्यांच्या समाजहिताच्या तळमळीची पूर्ण खात्री पटल्यानंतरच शाहू छत्रपतींनी त्यांची नेमणूक पाटगावच्या पीठावर केली.

११ नोव्हेंबर १९२० रोजी मराठा उपाध्यांनी वैदिक मंत्रांच्या घोषात सदाशिवराव लक्ष्मणराव पाटील-बेनाडीकर यांचा सशास्त्र पट्टाभिषेक केला. क्षात्रपीठाची पुनर्स्थापना झाली. पाटगाव पीठाच्या परंपरेतील ते दहावे धर्मगुरू झाले. अधिकृत क्षत्रिय जगद्गुरू पीठावरील ते पहिलेच मानकरी ठरले, पण यामुळे महाराष्ट्र मात्र धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे ढवळला गेला.

राजर्षी शाहू छत्रपतींनी केलेल्या या क्रांतिकारी प्रयोगामुळे धार्मिकबाबतीत मराठा बहुजन समाज स्वतंत्र झाला. त्यानंतर करवीर छत्रपती तसेच तत्कालीन मुंबई इलाख्यामध्ये मराठा बहुजनांची बारसे, लग्न, अंत्येष्टी अशी सर्व प्रकारची संस्कार (विधी) क्षात्रजगद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले मराठा पुरोहित करू लागले. आजही 'शाहू वैदिक विद्यालयातील बहुजन पुरोहित मोठ्या संख्येने बहुजन मराठ्यांचे धार्मिक कार्य करण्यात अग्रेसर असतात. शाहू महाराजांनी क्षात्रजगद्गुरू पदाची निर्मिती ही धार्मिक क्षेत्राशी मर्यादित न ठेवता बहुजन समाजाला त्रासदायक ठरणाऱ्या व प्रगतीच्या आड येणाऱ्या इतर सर्व क्षेत्राशी स्वतःला जोडून घेतल्याचे त्यांच्या कार्यावरून दिसते.

**(लेखिका या शाहू छत्रपती चरित्र अभ्यासक आहेत.)**

लोकमत

# विद्यापीठाचा वर्धापन साध्या पद्धतीने होणार

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा वर्धापनदिन १८ नोव्हेंबर रोजी साध्या पद्धतीने साजरा केला जाणार आहे. यादिवशी सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. दरवर्षी होणारे अन्य कार्यक्रम हे व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार यंदा रद्द करण्यात आले आहेत.

Hello Kolhapur Gramin
Page No. 4 Nov 11, 2020
Powered by: erelego.com

11 NOV 2020

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठास शासन आदेशाची प्रतीक्षा

## अधिकार मंडळाच्या निर्णयानंतर कार्यवाही

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभाग सुरू करण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. मात्र, शिवाजी विद्यापीठास राज्य सरकारच्या आदेशाची प्रतीक्षा असून विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानंतरच त्या-त्या जिल्ह्यातील परिस्थिती




पाहून अंतिम निर्णय होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'यूजीसी'ने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे लागणार आहे.

कोरोना विषाणू संसर्गामुळे मार्च महिन्यापासून महाविद्यालये, विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्था बंद आहेत. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांत २७० हून अधिक महाविद्यालये असून अडीच लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सद्य:स्थितीत पान २ वर

> महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभाग सुरू करण्याबाबत शासनस्तरावर नियोजन सुरू आहे. सर्व शिक्षण संस्थांना एकसारखे नियम लागू व्हावे, यासाठी राज्य सरकार शैक्षणिक संस्थांकडून आढावा घेणार आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे महाविद्यालये सुरू करण्याबाबत एक समिती गठित केली जाणार आहे. अधिकार मंडळासमोर समितीचा अहवाल ठेवून महाविद्यालये सुरू करण्याचा अंतिम निर्णय घेतला जाईल.
>
> - प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना आवश्यक

संस्थेतील जागेच्या उपलब्धतेनुसार ५० टक्के विद्यार्थ्यांना आलटून-पालटून प्रवेश, वर्गाची कमीत कमी संख्या, मास्कचा वापर याबरोबरच सतत हात धुणे, विद्यार्थी, शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांची कोविड-१९ स्क्रीनिंग करणे, वर्ग खोल्या, सार्वजनिक वापराच्या जागांचे निर्जंतुकीकरण, कॅम्पसमध्ये विलगीकरण व्यवस्था उभारणे आदी उपाययोजना कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठ व उच्चशिक्षण संस्थांना कराव्या लागणार आहेत.

## विद्यापीठास शासन आदेशाची प्रतीक्षा

**(पान १ वरून)** पदवीची ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली असून पदव्युत्तरचे प्रवेश अद्याप झालेले नाहीत. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिकविले जात आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शैक्षणिक संस्थेत प्रवेश देताना प्रत्येकाच्या शरीराचे तापमान मोजले जाणार आहे. मास्क, सॅनिटायझेशन यंत्रणा उपलब्धतेची तपासणी करणे बंधनकारक असणार आहे. प्रवास निर्बंध किंवा व्हिसा आदी गोष्टींमुळे अभ्यासक्रमासाठी सहभागी न होऊ शकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करावी, अशा स्पष्ट सूचना 'यूजीसी'ने दिल्या आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठाकडून तयारी सुरू झाली आहे. **(समाप्त)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 NOV 2020
सकाळ

# अंतिम वर्षाच्या परीक्षा निर्विघ्नपणे

## १७२ अभ्यासक्रमांचा समावेश; १०० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा आज निर्विघ्नपणे पार पाडल्या. २७ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर कालावधीत एकूण १७२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण झाल्या. आत्तापर्यंत १०० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. यामध्ये आज जाहीर केलेल्या २९ अभ्यासक्रमांच्या निकालांचाही समावेश आहे. आज ६०४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर ४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली.

अंतिम वर्षांच्या परीक्षा म्हणजे अडथळ्यांची शर्यतच झाल्या होत्या. मुळातच सॉफ्टवेअर खरेदीला उशीर झाला. १७ ऑक्टोबर रोजी या परीक्षा होणार होत्या. त्यानंतर त्या २१ ऑक्टोबरला होणार, असे जाहीर केले. त्यानंतर चक्रीवादळामुळे या परीक्षा २७ ऑक्टोबर रोजी घेणार असल्याचे जाहीर झाले. विद्यापीठाने घेतलेल्या सराव परीक्षेतही बराच गोंधळ झाला.



त्यानंतर मात्र विद्यापीठाने तंत्रज्ञानाच्या पातळीवर विविध उपाययोजना करून अंतिम वर्षाच्या परीक्षांना सुरुवात केली. यासाठी विद्यापीठाने आपत्ती निवारण कक्षही उभारला होता. पंधरा दिवसांत सुमारे १७२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. त्यातील १०० परीक्षांचे निकालही जाहीर केले. या कालावधीत किरकोळ अपवाद वगळता कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.

दरम्यान, आज ६०४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली तर ४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. पहिल्या सत्रात एम.बी.ए. अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. दुसऱ्या सत्रात एम.एस.सी व एम.बी.एची परीक्षा झाली. आज सुमारे २९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2020
पुढारी

# अंतिम वर्षाचे १०० हून अधिक निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या १०० हून अधिक परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाच्या वतीने अंतिम वर्ष शेवटच्या सत्र परीक्षा सुरू आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे अडीच लाख परीक्षार्थी आहेत. परीक्षा विभागाकडून १७० पैकी १०० हून अधिक अंतिम वर्षाच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2020
पुण्यनगरी

# शुद्ध हवेबाबत आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शहरातील हवा प्रदूषणाबाबत जनजागृतीसाठी कोल्हापूर महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत ऑनलाईन कार्यशाळेचे अयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे. कार्यशाळेमध्ये पर्यावरणतज्ज्ञांची माहितीपर व्याख्याने होणार आहेत. यामध्ये कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर शहरामधील हवा प्रदूषण, त्याची कारणे, घातक परिणाम, त्यावरील उपाययोजना या विषयांवर आधारित ही कार्यशाळा असणार आहे. कार्यक्रम ऑनलाईन माध्यमातून 'वेबेक्स'वर घेण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2020
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन साधेपणाने

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा वर्धापन दिन दि. १८ नोव्हेंबर रोजी साधेपणाने साजरा केला जाणार आहे. सकाळीं ८.३० वाजता विद्यापीठ प्रांगणात कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार कोविड-१९ च्या संसर्गजन्यामुळे या वर्षी विद्यापीठ वर्धापन दिन कार्यक्रम साधेपणाने साजरा केला जणार आहे. या समारंभास विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपस्थितांनी कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या, विद्यापीठाच्या मार्गदर्शक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरू असल्याने सर्व परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेल्या पाल्यांना व शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधीमधून प्रमाणपत्र व बक्षीस पाठवण्यात येणार आहे. वर्धापनदिनी दि. १८ नोव्हेंबर रोजी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११.३० अशी असणार आहे, अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2020
पुढारी

संक्षिप्त

## विद्यापीठाच्या १९ पासून प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १९ नोव्हेंबरपासून एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या प्रवेश परीक्षा ऑफलाईन 'ओएमआर' पद्धतीने घेण्यात येणार आहेत. प्रवेश परीक्षा यापूर्वी ७ ते १२ नोव्हेंबर दरम्यान होणार होत्या. परंतु काही तांत्रिक कारणांमुळे वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. १९ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत तीन सत्रांत एम.ए., एम.एस्सी., मास कम्युनिकेशन, बी.जे., एम.जे., बी.लिब,एम. लिब,एम.बी.ए.,एम. टेक., एम.आर.एस., एम.एस.डब्ल्यू. आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2020

लोकमत

# 'पाऊलखुणांचा शोध'चे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी वित्त व लेखाधिकारी बी. एस. पाटील लिखित 'पाऊलखुणांचा शोध' या संस्मरणात्मक आत्मकथनाचा ऑनलाईन प्रकाशन समारंभ आज, बुधवारी दुपारी चार वाजता होणार आहे. भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असून, अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. या समारंभास मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी चंद्रकांत कुंभार प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती भाग्यश्री पाटील-कासोटे आणि इंद्रजित कासोटे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2020
लोकमत

# वस्तुसंग्रहालयबाबत प्रवेश १९ नोव्हेंबरपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागातील वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रम या एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दि. १९ ते २७ नोव्हेंबर या कालावधीत ऑफलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज घेण्यात येणार आहेत. अर्ज छाननी दि. १ आणि २ डिसेंबर रोजी होणार आहे. अंतिम यादी ३ ते ८ डिसेंबर या कालावधीत प्रसिद्ध होईल. इच्छुकांनी इतिहास अधिविभागाशी संपर्क साधावा.